N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0205 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/08/2026 16:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 16/06/2026
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/06/2026
   **Time From (वेळेपासून):** 11:54 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/08/2026 **Time (वेळ):** 16:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/08/2026 16:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** निरंजन हटेल,एफ सी रोड,शिवाजीनगर पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती आसावरी शेडगे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक लाप्रवि पुणे ,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक लाप्रवि पुणे ,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8425808058

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अश्विनी दत्तात्रय कोकाटे | | | 1. रुम नं 904,रुद्र सोसायटी,,, केसनंद रोड,वाघोली ताहवेली जि,वाघोली पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | महेश मधुकर मुंढे | | | 1. शिवाजीनगर, तलाठी कार्यालय पुणे,शिवाजी नगर,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी दि.4/08/2026

मी आसावरी जगन्नाथ शेडगे वय- 36 वर्षे, व्यवसाय – नोकरी,पोलीस निरीक्षक,नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो.8425808058

आम्ही दि.15/06/2026 रोजी 17.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्री दयानंद गावडे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार संदिप गोपाळ पाटे वय 37 वर्षे धंदा-व्यवसाय(कॉन्ट्रॅक्टर) रा.ठी. सर्वे नं 140,भूलेनगर,लेन नं 4,श्री संकूल हाउसिंग सोसायटी,प्लॉट नं बी 13,मांजरी बूंद्रूक यांची ओळख करुन दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत तक्रार असून ती घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशित केले व सदर कारवाईकामी पोशि 2845/विकास आडके, मपोशि 7934/ वैशाली माकर,चालक पोहवा काकडे असे पथक मदतीकरता दिले. तसेच महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कार्यालयाचे पंच नामे श्री.सचिन संजय गायकवाड वय 42 वर्षे पद-कनिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्रं 1 पुणे रा. सं.न 25,गणेश नगर,बोपोडी,पुणे व श्री.प्रविण संभाजी चौधरी वय 35 वर्षे कनिष्ठ लिपीक, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्रं 1 पुणे रा.बंडगार्डन,कोरेगाव पार्क, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,पुणे असे उपलब्ध करुन दिले.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.संदिप पाटे व सापळा पथक तसेच शासकिय पंचासह आमचे कक्षात आलो.आम्ही सर्वांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संदिप गोपाळ पाटे वय 37 वर्षे धंदा-व्यवसाय(कॉन्ट्रॅक्टर) रा.ठी. सर्वे नं 140,भूलेनगर,लेन नं 4,श्री संकूल हाउसिंग सोसायटी,प्लॉट नं बी 13,मांजरी बूंद्रूक असे सांगितले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार श्री. संदिप पाटे यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी होत असलेबाबत तक्रार असून त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करण्यास तयार आहात का?अशी विचारणा करता दोन्ही पंचांनी त्यास संमत्ती दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांची तक्रार प्रथम तोंडी ऐकून घेतली. त्यावरून तक्रारदार, पंच साक्षीदार यांना अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून करण्यात येणा-या पुढील पडताळणी व सापळा कार्यवाही बाबतची सविस्तर माहिती दिली. तसेच सदर कार्यवाही कामी पंच क्रं 1 म्हणुन श्री.सचिन गायकवाड व पंच क्रं 2 म्हणुन श्री.प्रविण चौधरी हे काम पाहतील असे सर्वोनुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन केली व नंतर लिहून दिली ती पुढीलप्रमाणे - संदिप गोपाळ पाटे वय 37 वर्षे धंदा-व्यवसाय(कॉन्ट्रॅक्टर ) रा.ठी. सर्वे न140,भूलेनगर, लेन नं 4,श्री संकूल हाउसिंग सोसायटी,प्लॉट नं बी 13,मांजरी बूंद्रूक मोनं.9697557777

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्यावर माझ्या परीवारासमवेत राहत आहे.मी गेल्या 10 वर्षापासून खोदकाम कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करीत आहे.माझ्या फर्म चे नाव बालाजी अर्थमूव्हर्स असे आहे.मी सध्या सेनापती बापट रोड सर्वे नं 967 याठिकाणी सुरु असणा--या प्लीसंट व्हेंचर फर्म एसबीआर कर्मशिअल प्रोजेक्ट चे इमारतीचा पाया खोदण्याचे काम करीत आहे.सदर प्रोजेक्टच्या इमारतीचा पाया खोदकामासाठी प्लीसंट व्हेंचर फर्म चे बिल्डर यांनी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे गौण खनिजाच्या उत्खनाची परवाणगी घेतली असून त्यानूसार बिल्डर यांना 5923 ब्रास गौण खनिज उत्खणाची परवाणगी मिळाली आहे.त्यानूसार फेब्रुवारी 2026 मध्ये मी

इमारतीचा पाया खोदण्याचे काम सुरु केले असून आतापर्यंत 3000 ब्रा्रासचे खोदकाम केले आहे व मार्च 2026 पासून काही अडचणीमूळे सदर प्रोजेक्टचे काम बंद आहे.दि.12/6/2026 रोजी तलाठी अश्विनी कोकाटे (शिवाजीनगर तलाठी कार्यालय)यांनी मला माझ्या मोबाईलवर संपर्क करुन कलेक्टर ऑफिसच्या कॅन्टींग मध्ये बोलाविले.तेव्हा मी त्यांना भेटण्याकरीता गेलो असता तलाठी कोकाटे यांनी मला प्लीसंट व्हेंचर फर्म प्रोजेक्ट येथील मी केलेल्या खोदकामाचा त्यांनी केलेला पंचनामा दाखविला व मी 3200 ब्रा्रास जास्त खोदकाम केले असल्याचे सांगुन 2 कोटी दंड बसत असल्याचे सांगितले. तेव्हा मी त्यांना एव्हढी जास्त खोदाई मी केली नसल्याचे सांगून पुन्हा पंचनामा करण्यास सांगितले असता त्यांनी मला पंचनामा बरोबर आहे असे म्हणून तहसिलदार यांच्याकडे नील पंचनामा सबमिट करण्यासाठी 10 लाखाची लाचेची मागणी केली.तसेच मी जर 10 लाख जमा नाही केले तर तहसिलदार यांच्याकडे 3200 ब्रा्रास जास्त खोदकाम केल्याचा रिपोर्ट सादर करणार असे म्हणाले. तरी प्लीसंट व्हेंचर फर्म प्रोजेक्ट याठिकाणी मी जास्त खोदाई केली नसताना तलाठी कोकाटे यांनी मी 3200 ब्रा्रास जास्त खोदकाम केले असल्याचे पंचनाम्यामध्ये दाखवून तहसिलदार यांना निल पंचनामा सादर करण्यासाठी माझ्याकडे 10 लाखाची लाचेची मागणी केली असल्याने माझी त्यांचेविरोधात कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे. हिच माझी तक्रार असून ती बरोबर व खरी आहे.तक्रारदार यांनी लिहिलेली तक्रार वाचून त्यावर तक्रारदार आम्ही व पंचानी सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पुढील कारवाईबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी लोकसेविका कोकाटे यांचे निश्चित ठिकाण सांगता येणार नसल्याने त्यांना त्यांच्या मोबाईल क्रंमाकावर संपर्क करुन त्यांची भेट घेणेबाबत सांगितले असता आम्ही तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली.एक नवीन सिलबंद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची सर्वासमक्ष पाहणी केली असता, त्याचे एका बाजुस EVM ELITE 32 GB MICRO SD CARD C10 IU V10 व दुस-या बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले असल्याचे दिसुन आले.मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातून बाहेर काढले ते व्हाईस रेकॉर्डरमध्ये घातले.इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापूर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे पंच व तक्रारदार यांना खात्री करुन दिली.तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण मपोशि वैशाली माकर यांचेकडील मोबाईलमध्ये करण्यात येणार असलेचे सांगुन त्यांचा विवो कंपनीचा मोबाईल दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर एका बाजुस EVM ELITE 32 GB MICRO SD CARD C10 IU V10 व दुस-या बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE छापलेले असल्याचे दिसुन आले.सदर मेमरी कार्ड विवो कंपनीच्या मोबाईलमध्ये बसवून त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.

त्यानंतर पो.नि.शेडगे मॅडम यांचे सुचनेवरुन पोशि आडके यांनी प्रथम तक्रारदार, व नंतर आम्हां पंचाचे पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 18.04 वा होती.त्याचे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात आले आहे. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांचे मोबाईलचा स्पीकर ऑन करुन त्यांचा मो. क्रं.9697557777 वरुन लोकसेविका कोकाटे यांचा मो.क्रं 9763022320 यावर संपर्क केला असता लोकसेविका कोकाटे यांनी कॉल रिसीव्ह केला नाही त्यामूळे आम्ही पुढील कारवाई लोकसेविका कोकाटे या संपर्क करतील तेव्हा करण्याचे ठरवून तक्रारदार व पंचाना दि.16/6/26 रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी 10.00 वाजता हजर राहण्याच्या सुचना दिल्या व सदरदिवशीची कारवाई स्थगित केली.सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे दि.16/06/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक असे सकाळी 10.00 वाजता ला.प्र.वि.पुणे कार्यालय येथे हजर झाले.थोडयाच वेळात तक्रारदार हि लाप्रवि कार्यालयात हजर झाले व त्यांनी सांगितले कि लोकसेविका कोकाटे यांनी त्यांनासंपर्क करुन 11.00 वाजता कळवेल त्याठिकाणी भेटण्यास बोलाविले आहे असे सांगितले.त्यामूळे आम्ही लोकसेविका कोकाटे यांना संपर्क करुन भेटण्याचे निश्चित ठिकाण माहिती करुन पुढील कारवाई करण्याचे ठरविले. ला्प्रवि कार्यालय पुणे येथून पुढील पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरवून आम्ही तक्रारदार, पंच साक्षीदार व सापळा पथक यांना पुढील पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यामध्ये तक्रारदार,पंच क्र.1 श्री.गायकवाड व पंच क्र.2 श्री.चौधरी यांची पडताळणी निवेदन ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 11.28 वाजता ची होती. त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले.त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेविका कोकाटे यांना मोबाईलद्वारे संपर्क करुन भेटण्याचे ठिकाण माहिती घेण्याचे ठरविले शासकिय व्हाईसरेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पीकर ऑन करुन त्यांचा मोबाईल क्रं 9697557777 यावरुन लोकसेविका कोकाटे यांच्या मो. क्रं 9763022320 यावर संपर्क केला असता लोकसेविका कोकाटे यांनी तो उचलुन एफ सी रोड पुणे येथे भेटण्यास बोलाविले. त्यानंतर तक्रारदार यांची लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार व पंच क्रं 1 गायकवाड यांना सुचना देवून व्हाईस रेकॉर्डर

चालू करून तो तक्रारदार श्री.पाटे यांच्या शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व पंच क्र.01 श्री.गायकवाड यांचेसह तक्रारदार यांची दुचाकी क्र एमएच 12 व्हिके 9999 वरुन पडताळणीकामी लाप्रवि कार्यालयातून एफसी रोड येथे रवाना केले ती वेळ 11.54 वा ची होती.

त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले ती वेळ 12.59 वा ची होती.सदर वेळी व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही पंच क्रं 1 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार दूचाकीने लोकसेविका कोकाटे यांनी तक्रारदार यांच्या मोबाईलवर पाठविलेल्या लोकेशनवर निरंजन हॉटेल मध्ये पोहचलो तेव्हा हॉटेलमध्ये गेल्यानंतर तक्रारदार यांनी एका महिलेचे दिशेने खूणवून त्या लोकसेविका कोकाटे असल्याचे सांगितले तेव्हा लोकसेविका कोकाटे या एका इसमासोबत बसून होत्या म्हणून मी व तक्रारदार असे दोघे लोकसेविका कोकाटे बसलेल्या टेबलावर जावून बसलो तेव्हा लोकसेविका व तक्रारदार यांच्यात कामासंदर्भात चर्चा झाली त्यानंतर तक्रारदार हे लोकसेविका कोकाटे यांना तुम्ही तुमच्या तों ंडानी सांगा किती द्यायचे असे म्हणालेत्यावर लोकसेविका कोकाटे तुम्ही तो फोटो काढुन घेतला पंचनाम्याचा दाखवला का त्यावर तक्रारदार हे नाय, नाय दाखवल मी..... त्यांना अमाउटच ते म्हणतात ना जास्त होतीये त्यावर लोकसेविका काय दहा टक्के पण नाहीये तुमच्या उतखनाच्या दंडाच्या 10 टक्के पण नाही ये त्यावर तक्रारदार मला म्हणाले मॅडमनी त्या दिवशी मला दहा लाख रुपये सांगितल होत. मी त्यांना त्या दिवशी तुम्हाला म्हटल काय कमी करता येतील करा.नाही आता त्याच्या हातात त्यावर लोकसेविका कोकाटे मला म्हणाल्या किती वेळ गेलाय एवढ दिवस आम्ही नाही ठेवु शकत सरामुळ त्या दिवशी मला म्हणालें मला दोन दिवस दया असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार म्हणाले साहेब बाहेर होते. ना तेच बाहेर होते ते आउट ऑफ होते. काल मला संध्याकाळी सहा वाजता क्लि ्अरंन्स भेटल्यावर लोकसेविका कोकाटे म्हणाल्या टोटल दोन अडीच कोटीपर्यत दंड येईल टेन पर्सनट पण नाहीये त्यावर तक्रारदार मला म्हणाले तु ्म्हाला वाटल तुम्ही एकदा मॅडमशी बोला कायत्यावर लो ेकसेविका कोकोटे म्हणाल्या ....जो पर्यत मी सबमीट करत नाय ...तो पर्यंत ...तो विषय माझा.....ये, मी सबमीट केल्यानंतर त्यांच्या त्यांच्या लेव्हलच आकडे सुरु होतील तुम्ही भरा ् त्यांच्या लेव्हलचे आकडे मग...त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेविका कोकाटे सोबत असणारे इसमाला उददेशून हाच नाव काय असे म्हणाले त्यावर लो ेकसेविका कोकाटे महेश मुंढे त्यावर तक्रारदार काय म्हणुन ये त्यावर लोकसेविका कोकाटे कोतवाल ये कोतवाल असे म्हणाल्या त्यावर तक्रारदार आता मॅडम परत ...परत... मिंटीग नको तुम्ही काय तरी फायनल सांगा त्या हिशोबाने त्यावर लोकसेविका कोकाटे फायनल फायनल मी जास्त म्हणतच नाय, फायनलच आहे तुम्हचं ही जास्त ये..त्यापध्तीच मी म्हणते. त्यावर तक्रारदार काहीतरी करा कमी आता एवढा लांब आलोय आम्ही त्यावर लो ेकसेविका कोकाटे तुम्हीच थोड फार आम्हाला दया. आम्हाला वरती देवुन थोडंसं खाली राहिल आम्ही पाच सहा दिवस थांबलोय आम्हालाच काहीतरी दया.....ऐका की, तुम्हाला दोन तास देते तुम्ही कुठ येणार ये सांगा मी हाला पाठविते(कोतवाल महेश मुंढे ला उददेशन) बाकी काय सगळ विषय मॅनेज करते.तुम्हाला त्रास नाही होणार.आता एक वाजलय मला अडीच पर्यत करुन दया जास्तीत जास्त 3 वाजेपर्यत....महेश तुझा नंबर दे सरांना त्यावर कोतवाल महेश मुंढे हा आहे नंबर हांचा माझ्याकड त्यावर लोकसेविका कोकाटे हया मिसकॉल कर त्यांना म्हणजे त्यांच्या लक्षात येईल असे म्हणाले तेव्हा कोतवाल महेश मुंढे याने तक्रारदार यांच्या मोबाईलवर मिसकॉल दिला.त्यानंतर लोकसेविका कोकाटे व कोतवाल महेश मुंढे सदर ठिकाणाहून निघून गेले त्यानंतर मी व तक्रारदार त्यांचे दुचाकी ने लाप्रवि कार्यालयात परत आलो.

अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितल्यानंतर आम्ही तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र.1 यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली.तसेच तक्रारदार यांनी सांगितले कि,लाच मागणी झाली त्यावेळी पंच क्र1 गायकवाड हे त्यांच्या सोबतच होते त्यांनी तक्रारदार यांचेतील संभाषण पाहीले व ऐकले आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील फाईल ध्वनिमुद्रीत फाईल क्र.07 फास्ट फारवर्ड करून ओपन स्पीकर करून दोन्ही पंचासमक्ष ऐकली असता सदर संभाषण तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेल्या हकिकतेप्रमाणे बरोबर असल्याची खाञी केली.एकंदरीत पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांनी त्यांना प्राप्त परवाण्याचे मर्यादेत खोदकाम केले असूनही लोकसेविका कोकाटे यांनी पंचनाम्यामध्ये 3200 ब्रा ास जास्त खोदकाम केले असल्याचे पंचनाम्यामध्ये दाखवून तहसिलदार यांना निल पंचनाम्याचा अहवाल सादर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 10 लाखाची लाचेची मागणी केल्याचे तसेच कोतवाल महेश मुंढे यांनी लोकसेविका कोकाटे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवून लोकसेविका कोकाटे यांच्या लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार पाटे यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडील 2,00,000/- रुपये हजर केले तक्रारदार यांचेकडे लोकसेवक यांनी मागणी

केल्याप्रमाणे संपुर्ण रक्कम नसल्याने सदर रकमेमध्ये खेळण्यामधील 500/- रुपये दराच्या एकुण 1600 बनावट नोटांचा समावेश करुन (एकुण 8,00,000/-बनावट ) रक्कम ठेवण्याचे ठरविले.तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाच रकमेच्या नोटांचे नंबर कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पंचाना व तक्रारदार यांना अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन व त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवून सदर नोटांना अँन्थ्रासीन पावडर लावून तक्रारदार यांच्या गाडीच्या डिक्कीत ठेवली. त्यानंतर पोलीस निरिक्षक आसावरी शेडगे यांचे सुचनेवरून पोशि आडके यांनी त्यांचेकडील शासकीय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंच क्रं 1.गायकवाड व पंच क्र.2 श्री चौधरी यांची सापळा कार्यवाही करीताची निवेदने व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये 14.58 वा. ध्वनीमुद्रीत केलीव त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले.त्यानंतर लोकसेविका कोकाटे यांनी कोतवाल महेश मुंढे यांना फोन करण्यास सांगितल्याप्रमाणे शासकिय रेकॉर्डर ऑन करुन भेटण्याचे ठिकाण निश्चित करण्याकरीता कोतवाल महेश मुंढे व लोकसेविका कोकाटे यांना संपर्क केला असता त्यांनी तक्रारदार यांचे फोन उचलले नाहीत त्यामूळे लोकसेविका कोकाटे व कोतवाल महेश मुंढे यांची भेट न झाल्याने सापळा कारवाई होवू शकली नाही. त्यामूळे सदर दिवशीची कारवाई स्थगित करुन सापळा कारवाई दि.17/6/2026 रोजी करण्याचे ठरवून पंचाना व तक्रारदार यांना सुचना दिल्या.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.17/06/26 रोजी सापळा कारवाई आजमावण्या करीता सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार व पंच यांची निवेदन घेवून त्याचे व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात आले.त्यानंतर तक्रारदार यांच्या मोबाईलचा स्पीकर ऑन करुन त्यांच्या मोबाईलवरुन लोकसेविका कोकाटे व कोतवाल महेश मुंढे यांना रेग्यूलर व व्हॉटसअप कॉल केले असता त्यांनी तक्रारदार यांचे फोन न उचलल्याने सापळा कारवाई होवू शकली नाही.त्यामूळे सदर दिवशीची कारवाई स्थगित करुन सापळा कारवाई लोकसेविका कोकाटे व कोतवाल महेश मुंढे हे तक्रारदारांशी संपर्क करतील त्यावेळी करण्याचे ठरवून पंचाना व तक्रारदारांना गोपणीयता राखण्याच्या सुचना देण्यात आल्या.सदर बाबत सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.

दि.27/07/2026 रोजी तक्रारदार यांनी आम्हाला फोन करुन सांगितले कि,ते सदर दिवशी तलाठी कार्यालय शिवाजीनगर पुणे येथे त्यांच्या कामासंदर्भात लोकसेविका कोकाटे यांची भेट घेण्यासाठी गेले असता त्याठिकाणी लोकसेविका कोकाटे या मिळून न आल्याने तलाठी कार्यालयातच मंडळ अधिकारी पुष्पा गोसावी या बसत असल्याने तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी पुष्पा गोसावी यांचेकडे लोकसेविका कोकाटे यांच्याबददल विचारपूस केली असता मंडळ अधिकारी पूष्पा गोसावी यांनी त्यांच्या मोबाईलवरुन लोकसेविका कोकाटे यांना फोन करुन तक्रारदार यांच्याबाबत सांगितले असता लोकसेविका कोकाटे यांनी त्यांनी तक्रारदार यांच्या कामाचा अहवाल तहसिलदार यांच्याकडे सबमिट केल्याचे सांगून फोन कट केला असल्याबाबत सांगितले.लोकसेविका कोकाटे यांनी तक्रारदार यांच्या खोदकामाचा पंचनाम्याचा अहवाल तहसिलदार यांच्याकडे सादर केला असल्याने व लोकसेविका या तक्रारदार यांना प्रतिसाद देत नसलेने व कार्यालयात मिळून येत नसलेने लोकसेविका अश्विनी कोकाटे तसेच कोतवाल महेश मुंढे यापुढे तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्वीकारणार नाहीत. व भविष्यात देखील ते तक्रारदार यांचेकडून लाच रकमेबाबत बोलणी करून स्वीकारणार नाहीत. अशी खात्री झाली आहे.तसा तक्रारदार यांचा जबाब नोंद करण्यात आलेला आहे.

तरी दि.15/06/2026 रोजीच्या तक्रारदार यांच्या तक्रारी वरुन दि.16/6/2026 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्याण निरंजन हॉटेल,एफ सी रोड,शिवाजीनगर याठिकाणी 11.54 ते 12.59 वाजताच्या दरम्याण लोकसेविका अश्विनी कोकाटे (तलाठी ) कार्यालय शिवाजीनगर पुणे यांनी तक्रारदार यांच्या प्लीसंट व्हेंचर फर्म प्रोजेक्ट याठिकाणी तक्रारदार यांनी त्यांना प्राप्त परवाण्याचे मर्यादेत खोदकाम केले असूनही लोकसेविका कोकाटे यांनी पंचनाम्यामध्ये 3200 ब्रास जास्त खोदकाम केल्याचे दाखवून तहसिलदार यांना निल पंचनाम्याचा अहवाल सादर करण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे 10 लाखाची लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम कोतवाल महेश मुंढे यांचेकडे देण्यास सांगितले.तसेच कोतवाल महेश मुंढे याने लोकसेविका कोकाटे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवून लोकसेविका कोकाटे यांच्या लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन लोकसेविका अश्विनी दत्तात्रय कोकाटे वय 37 वर्षे पद-तलाठी नेमणूक-तलाठी कार्यालय शिवाजीनगर रा.रुम नं.904,रुद्र सोसायटी,एसआर पेट्रोल पंपासमोर,केसनंद रोड,वाघोली जि.पुणे यांचेविरुदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये तसेच कोतवाल महेश मधूकर मुंढे नेमणूक-तलाठी कार्यालय शिवाजीनगर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 12 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष
आसावरी शेडगे पोलीस निरिक्षक लाचलुतपत प्रतिबंधक विभाग ,पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)
SAMBHAji SHIVAJI JADHAV
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): API
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

ठाणे अमलदार
शिवाजीनगर पोलीस ठाणे
पुणे शहर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Name (नाव):** GIRISH VISHWASRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN83692

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)